बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०४ नोव्हेंबर २०२५**

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५७/२०२५ भा. न्याय संहिता कलम ८५,११५(२),३५२,३५१(१),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०६/११/२०२१ रोजी पासुन ते आजतागायत, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०३/११/२०२५ रोजी १८.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | बिल्कीस मोईन पठाण, वय- २४ वर्षे, रा. पाथरुट चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मोईन- पती, २) नवाज- सासरे, ३) शबाना- सासु, ४) निलोफर- जाऊ, ५) अलफिया- दिर, ६) फारुख- पतीचा मामा, ७) रियाज शेख, सर्व रा. नई जिंदगी, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीस घरातील किरकोळ कारणावरुन तसेच लग्नात मानपान केला नाही, जास्त हुंडा दिला नाही, या कारणावरुन व नविन व्यवसाय चालु करण्यासाठी माहेरुन २ लाख रुपये घेवून ये म्हणून शिवीगाळ करुन मारहाण करुन, फिर्यादीचा शारीरीक व मानसिक छळ करुन नांदविण्यास नकार दिला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ- १७७ माने- |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५१८/२०२५ भा. न्याय संहिता कलम ८५,११५(२),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/११/२० ते दि. ३०/०९/२०२५ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०३/११/२०२५ रोजी १८.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | लक्ष्मी अक्षयकुमार लिंबोळे, वय- २६ वर्षे, रा. सध्या- ३४/२, मोतीलाल नगर, साईबाबा चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अक्षयकुमार- पती, २) गुरुनाथ- सासरे, ३) इंदुमती, रा. १४४, राघवेंद्र नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर, ४) सुप्रिया- नणंद, रा. कर्णिक नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे सासरी व माहेरी असताना नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीचे चारित्र्यावर संशय घेवून तसेच पतीचे व्यवसायाकरीता तुझे माहेरकडुन ५० हजार रु घेवून ये म्हणून, वेळोवेळी फिर्यादीस मानसिक व शारीरीक छळ करुन उपाशी पोटी ठेवून, जाचहाट करुन शिवीगाळ करुन, मारहाण केली आहे म्हणून. तपास:- पोह- ९१७ घुगे- |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ८७१/२०२५ बालकामगार का क ३ व अल्पवयीन मुलाचे का व संरक्षण का क ७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०४/११/२०२५ रोजी १५.०० वा चे सुमारास, सात रस्ता, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. ०४/११/२०२५ रोजी २०.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | रजनीगंधा संदिप गायकवाड, म. फुले संस्था, रा आदित्य नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | रामरेज उमेरसिंग राजपुत, वय- २६ वर्षे, रा. मुन्सीपल कॉलनी, सात रस्ता, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील बालकामगार वय- १४ व ९ वर्षे यांना आरोपीत मजकुर याने वडापाव हातगाडीवर वडापाव विक्री करुन घेवून, अनावश्यक शारीरीक व मानसिक कष्ट देवून, गैरकृत्य व काम करुन घेवून त्यांची पिळवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोह- ४९५ जमादार- |